# या चार हिरकण्या

[ इरावती कर्वे, दुर्गा भागवत, इंदिरा संत व शांताबाई शेळके ]

इरावती कर्वे –

विचारात आधुनिकता, बुद्धीप्रामाण्यता व प्रखर विद्वत्ता ।
तरी मीरेसारखी, सखुसारखीच विठ्ठलावर गाढ श्रद्धा ॥
गमतीनेच पण भक्तीने विठ्ठलाला बॉयफ्रेंड म्हटले ।
हृदयीचा जीवलग म्हणून घट्ट नाते जोडले ॥
अशा होत्या इरावती कर्वे, संवेदनशील व अभ्यासू ।
साधे सरळ जीवन त्यांचे चिकित्सक व जिज्ञासू ॥

दुर्गाबाई भागवत –

निसर्गातील चैतन्य नेमकेपणाने टिपण्याचा ।
धर्मजीवन माणसाचे हा गहन विषय अभ्यासाचा ॥
ज्ञानेश्वरांनी पैसाच्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी लिहिली ।
अमर अस्तित्वाचे प्रतिक म्हणून साऱ्या विश्वाने गौरविली ॥
पैसाचा खांब महाशून्याचा दुर्गाबाईंनी भावूकतेने उभा केला ।
त्यांच्या लेखणीने असा, मानवी मनाचा ठाव घेतला ॥

इंदिरा संत –

मृदगंधाच्या गंधगाभारा अन् त्याचा मधुर गंध ।
आसमंतात भरून राहिला, भारलेल्या मातीचा सुगंध ॥
सहजता हाच स्वभाव-धर्म, गंध भारले चिंतन ।
असे होते संवेदनशील व प्रभावी, इंदिरासंत यांचे लेखन ॥

शांताबाई शेळके –

सूक्ष्म चिकित्सा घटनांची, अंतःवृत्तीने घेते शोध ।
रसिक बहुश्रुत, व समृद्ध जीवनाचा देते खरा बोध ॥
लोड घालून मिरविण्याची मनी हौस होती फार ।
शांताबाईंचे व्यक्तित्व म्हणजे आनंदाचे असे झाड ॥

चार स्तंभ हे आधाराचे, मम जीवनी अती स्फूर्तीचे
नित्य प्रेरणेचे, उत्साहाचे व नूतन काव्य-कलाकृतीचे
विनम्र होते, वंदन करते, चारही स्फूर्ती देवतांना ।
आशीर्वाद मज मिळावा, गगनी उंच भरारी घेतांना ॥

